*नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६२ /२०१५*
*निशाण क्र. ८७ लगत*



**<u>वादी सा.क्र.३ चा उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. बी.एम.दळवी यांचे मार्फत शपथेवर सुरु.</u>**

०५. हे खरे की, मी सौंदाळे येथील बाऊळवाडी येथे राहतो. हे खरे की, वादी, प्रतिवादी हे राणेवाडी येथे राहतात. हे खरे नाही की,बाऊळवाडी राणेवाडीपासून एक ते दिड कि.मी. अंतरावर आहे. हे खरे की, दावा मिळकतीच्या समोरुन तिर्लोट –वाघोटन रस्ता गेलेला आहे. हे खरे की, त्यामुळे दावा मिळकत ही किंमती जमिन आहे. हे खरे की, वादी व माझे संबंध चांगले आहेत. हे खरे नाही की, माझे व प्रतिवादीचे संबंध चांगले नाहीत. हे खरे नाही की, मी खरेदी केलेल्या जमिनीत जाण्यासाठी रस्ता नाही. हे खरे नाही की, मी वादीच्या बाजूने साक्ष दिली व वादीला जमिन मिळाली तर मला रस्ता मिळेल असे मला वाटते. हे खरे नाही की, मी माझ्या जमिनीचे प्लॉट केले आहेत.

०६. हे खरे नाही की, माझ्या सरतपासात लिहीलेला मजकूर की, वादीला मी दावा मिळकतीत वहिवाट करताना पाहिले हा खोटा लिहीला आहे. हे खरे नाही की, वादीचे दावा मिळकतीत घर व झाडे आहेत हे खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, दावा मिळकतीत प्रतिवादीची वहिवाट आहे. हे खरे नाही की, दावा मिळकतीत वादीचा मुलगा महेंद्र कायम राहत असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, मी वादीच्या सांगण्यावरुन खोटे सरतपासाचे शपथपत्र दिले व आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/–

(श्रीमती एन.बी.घाटगे )

दि. ०६/११/२०२४ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड